# राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेसमोर

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती
संभाजीनगर, बचत भवन लेखा व कोषागार
कार्यालयाच्या पाठीमागे,छत्रपती संभाजीनगर
-४३१००१

तक्रार क्र.५११/२०२२/छ.संभाजीनगर
(द्वितीय अपील क्र.१०३२/२०२०मध्ये)

श्री.महेश शंकरलाल शंकरपेल्ली, : तक्रारदार
रा. माँ दर्गा निवास,शास्त्री कॉलनी,सिल्लोड
जि.छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सह दुय्यम निबंधक वर्ग-२,सिल्लोड,जि.छत्रपती संभाजीनगर

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी
सह जिल्हा निबंधक वर्ग-१छत्रपती संभाजीनगर,
जि. छत्रपती संभाजीनगर

## निर्णय

(सुनावणी दि. ०७.११.२०२३)

तक्रारदार यांनी दि.२९.०४.२०२२ रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

"तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे.

मला हवी असलेली माहिती मला प्राप्त न झाल्यामुळे मी नियमानुसार राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे व्दितीय अपील क्रमांक १०३२/२०२० दाखल केले होते.त्यानुसार आयोगाने दिनांक ०५.०४.२०२१ रोजी माहिती देण्याबाबत आदेश परित केले होते. मा.आयोगाच्या निर्णयाची प्रत जोडून, मी दिनांक १९.०७.२०२१रोजी मा.दुय्यम निबधक वर्ग-२ कार्यालय सिल्लोड व सहजिल्हानिबधक वर्ग-१कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांना लेखी स्मरणपत्र दिले होते.मा.राज्य माहिती आयोग यांच्या आदेशाच्या अनुषंगाने सह जिल्हा निबधक वर्ग -१ छत्रपती संभाजीनगर यांना लेखी स्मरणपत्र दिल होते. परंतु अद्याप पर्यत त्यांनी मला जाणीवपूर्वक कसलाही /कोणताही प्रतिसाद दिलेला नाही."

सदर आदेशाची अंमलबजावणी केली नाही, अशी तक्रार करुन संबंधितावर कलम २०(१) (२) नुसार शिस्तभंग व दंडात्मक कार्यवाही करावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे.

आयोगाने द्वितीय अपील क्र.१०३२/२०२०मध्ये दि.०७.१२.२०२०रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले होते.

"वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात अपिलर्थी व्यक्तिश: उपस्थित राहिल्यास त्यांना माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.असा आदेश दिला आहे. "

सदर प्रकरणावर दि.१३.०६.२०२३रोजी ऑनलाईन सुनावणी घेण्यात आली होती, परंतु सदरील प्रकरणात सुनावणी परिपूर्ण न झाल्यामुळे सदरील प्रकरणात सुनावणी परिपूर्ण होण्यासाठी पुढील तारीख ठेवण्यात आली. पुढील सुनावणीला व्यक्तिश:उपस्थित राहण्यासाठी व माहिती देण्यात आली अथवा कसे याबाबतचा खुलासा सादर करण्यासाठी श्री.अ.वि.चटलावार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निंबधक वर्ग-२

सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर यांना दि.०३.०८.२०२३रोजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली.

त्यानुसार दि.२२.०८.२०२३ रोजी श्री.अ.वि.चटलावार,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबधक वर्ग-२ सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर यांनी खुलासा सादर केला.त्यामध्ये त्यांनी सुचित केले की,तक्रारदार यांचा माहिती अर्ज त्यांच्या कार्यालयात दि.३०.०८.२०१९ रोजी प्राप्त झाल्यानतंर त्यांनी दि.३१.०८.२०१९रोजीच्या पत्रान्वये माहितीच्या वस्तुस्थितीसंदर्भातील माहिती तक्रारदार यांना कळविण्यात आली होती.त्यानतंर सदर व्दितीय अपील प्रकरणामध्ये दि.०७.१२.२०२०रोजीच्या सुनावणी दरम्यान झालेल्या आयोगाच्या आदेशानुसार दि.२८.०१.२०२०. तद्दनतंरही दि.१४.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये माहितीच्या संदर्भात वस्तुस्थितीची माहिती पुन:श्च कळविण्यात आली आहे.त्यानुसार त्यांनी अभिलेख/पुरावा सोबत सादर केला आहे. त्यामुळे त्यांच्या कथनात तथ्यांश आढळून येतो.

आज दिनांक ०७.११.२०२३ रोजी सुनावणीस तक्रारदार श्री.महेश शंकरलाल शंकरपेल्ली, हे उपस्थित आहेत.तर श्री.अ.वि.चटलावार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निंबधक वर्ग-२ सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर यांनी दि.०६.११.२०२३ रोजी वैद्यकीय कारणास्तव दि.०७.११.२०२३रोजीच्या सुनावणीसाठी उपस्थित राहू शकत नसल्याबद्दलचे विनंती अर्ज त्यांनी आयोगाच्या कार्यालयात सादर केला.त्यामुळे ते सुनावणीसाठी अनुपस्थित आहेत.

तसेच सुनावणीवेळी तक्रारदारने यांनी सूचित केले की, त्यांनी दि.१८.८.२०२३रोजीच्या शपथपत्रामध्ये सदरच्या तक्रार क्र.५११/२०२२ मध्ये अंशत: माहिती प्राप्त झाली असून ,तक्रार नाही. यास्तव सदरची तक्रार अर्ज निकाली काढावा अशी विंनती केली आहे.

यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याचे स्पष्ट होते. तसेच तक्रारदार यांना माहिती मिळाल्याबाबत तक्रार नाही.व तक्रार निकाली काढण्यात यावी,असे सूचित केल्यामुळे,सदरची तक्रार निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

व्दितीय अपिलातील आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याकारणाने सदर तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

( समीर सहाय )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

तक्रार क्र.५११/२०२२/छ.संभाजीनगर/ एबीजे/जावक क्र. 13621 /२०२३ दिनांक : ~~26/12/2023~~
26/12/2023